# नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (बाजार विभाग)

## जाहिर सुचना

संदर्भ : शहर पथविक्रेता समिती सभा दि. 27/12/2022 ठराव क्र. 2

समस्त नागरीकांना याव्दारे सुचित करण्यात येते की, **दि. 09/01/2017** रोजीच्या शासन निर्णयाव्दारे निर्गमित केलेली पथविक्रेता योजना ही नागपूर शहराकरीता मार्गदर्शक योजना म्हणून **दि. 27/12/2022 ठराव क्र. 2** अन्वये शहर पथविक्रेता समितीने प्रारुप योजना म्हणून स्वीकार करुन समितीने या प्रारुप योजनेवर नागरीकांकडून, पथविक्रेत्यांकडून व त्यांच्या संघटना, अशासकीय सामाजिक संघटना संबंधित प्राधिकरणांकडून आक्षेप मागविण्याकरीता त्याबाबत सार्वत्रिक प्रसिध्दी करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

सबब समितीने मान्य करण्याकरीता विचाराधीन राज्य सरकारव्दारा दि. 09/01/2017 ची मार्गदर्शक योजना, हरकती, आक्षेप व सुचनांकरीता 30 दिवसाच्या मुदतीसाठी याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे. या योजनेचे प्रारुप खालील नमूद केलेल्या स्थळी उपलब्ध राहणार आहे.

1. महानगरपालिकेचे संकेतस्थळ **www.nmcnagpur.gov.in**
2. बाजार विभाग, तिसरा माळा मुख्य प्रशासकीय इमारत म.न.पा. सिव्हील लाईन नागपूर
3. सर्व क्षेत्रीय कार्यालय (झोन क्र. 1 ते 10)

ज्या कुणास या प्रारुप योजनेवर आपले अभिप्राय सुचना, हरकती नमूद करावयाचे असतील त्यांनी ही सुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून 30 दिवसाच्या मुदतीत लिखित स्वरुपात मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या बाजार विभाग, तिसरा माळा येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत सादर कराव्यात. वा संकेतस्थळावर सादर कराव्यात मुदती नंतर प्राप्त होणा-या हरकती, सुचना व आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

याकरीता खालीलप्रमाणे अधिकारी समन्वयासाठी नेमण्यात येत आहे.

1. श्री. प्रमोद वानखेडे, बाजार अधिक्षक, दुरध्वनी क्र. 9850796978
2. श्री. राजेश मेश्राम, अधिक्षक, दुरध्वनी क्र. 9823326658
3. श्री. प्रमोद खोब्रागडे, व्यवस्थापक, एन.यु.एल.एम. दुरध्वनी क्र. 9922093639

Advt No : 542/PR
Dt : 02/01/2023

उपायुक्त तथा नोडल अधिकारी
महानगरपालिका, नागपूर

Scanned with CamScanner